
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता




vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२ मार्च २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १८६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 2 March 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 186 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# आता मुंबईत धावणार पत्रकार कॅमेरामनसाठी स्वतंत्र ॲम्ब्युलन्स

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विधिमंडळात लोकार्पण


**राज्यभरातील विशेषतः मुंबई महानगराच्या कानाकोपऱ्यात दडलेल्या, घडलेल्या वेगवान घडामोडी अर्थात, 'ब्रेकिंग न्यूज' त्या-त्या क्षणाला लोकांपर्यंत पोचविणाऱ्या इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियातील पत्रकार-कॅमेरामन आणि संबंधित घटकांसाठी आता स्वतंत्र 'ॲम्ब्युलन्स' रस्त्यावर उतरल्या आहेत. मीडिया विश्वातील धावपळीत पत्रकारांच्या आरोग्याकरिता ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नवी मुंबईतील 'आरबीजी फाउंडेशन' आणि' टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन'च्या पुढाराकाने सुरू केलेल्या या सेवेचे उदघाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी मुंबईत झाले.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

विधान भवनाच्या आवारात झालेल्या या उदघाटन सोहळ्याला राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, रोजगार हमी योजनेचे मंत्री, भरत गोगावले, फाउंडेशनच्या अध्यक्ष मधुरा गेठे, टीव्ही जर्नालिसस्ट असोसिएशनचे अध्यक्ष उदय जाधव, सदस्य मनश्री पाठक यांच्यासह पंकज दळवी, कार्यकारिणी सदस्य मनाली गायकवाड, राजेश साफळे, अनिल सौंदडे असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही काळात प्रचंड वेगवान झाले आहे. त्यामुळे राजकारण आणि संबंधित बाबींना मीडियात महत्त्व दिले जाते. अशातच 'ब्रेकिंग न्यूज'च्या दुनियेत आघाडी घेत असताना, पत्रकार मंडळींची धावपळ होते. परिणामी, या सततच्या धावपळीने पत्रकार अणि इतर घटकांच्या आरोग्यावर कळत-नकळतपणे परिणाम होतो. ही बाब हेरून पत्रकारांच्या आरोग्याकडे वेळोवेळी लक्ष देऊन, हा घटक अधिक सक्षम राहावा, याकरिता आरबीजी फाउंडेशन'ने आणि टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन'ने पत्रकारांच्या आरोग्यासाठी योजना आखण्याचे नियोजन केले आहे. त्यातून फाउंडेशनने आता स्वतंत्र 'ॲम्ब्युलन्स' उपलब्ध करून दिल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक मीडियातील पत्रकार आणि कॅमेरामनचे नेतृत्व करणाऱ्या राज्यपातळीवरील 'टीव्ही जर्नालिस्ट असोएशिन'च्या माध्यमातून पत्रकार आणि कॅमेरामन यांच्यासाठी ही सेवा पुरविली जाईल.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पत्रकार हे अनेकदा अतिशय संवेदनशील ठिकाणी पोचून कव्हरेज करतात. त्यामुळे अपघात ओढण्याची भीती असते. अशा वेळी पत्रकारांना हक्काची सेवा देण्यासाठी आरबीजी फाउंडेशन आणि टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशनचा ही योजना चांगली आहे.''''पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी उपायांची गरज आहे. पत्रकारांसाठी ॲम्ब्युलन्स सुरू केली, हे स्तुत्य असले, तरी त्याची गरज येऊ नये, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या.फाउंडेशनच्या अध्यक्ष मधुरा गेठे म्हणाल्या, पत्रकारांचे आरोग्यासाठी ही संकल्पना आहे. त्यातून आता दोन ॲम्ब्युलन्स उपलब्ध केल्या आहेत. ॲम्ब्युलन्स सेवेनंतर पत्रकारांचे 'हेल्थ कार्ड' तयार करण्याचे नियोजन आहे. यापुढे 'टीव्हीजेए' च्या उपक्रमातत आरबीजी फाउंडेशनचे सहकार्य राहील. मनश्री पाठक यांनी प्रस्ताविक करू उपस्थितांचे स्वागत केले आणि आभार मानले.

# अवकाळी पावसामुळे वैरागड परिसरात फळ, भाजीपाला पिकांचे नुकसान




दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

दि. २३ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी आलेल्या अवकाळी पाऊसामुळे वैरागड आणि परिसरातील झाडावरील फळांचे, विटा व्यावसायिकांचे, भाजीपाला शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. संध्याकाळी विजेचा कडकडाट, वादळ वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने वैरागड आणि परिसरात विटा बनविणारे विटा व्यवसिकाचे विटा भट्टी पावसात भिजल्याने विटांचे नुकसान होऊन विटा व्यवसायीकांना फटका बसला आहे. तसेच पावसामुळे विटा भट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या मजुरीवर परिणाम पडला आहे. त्याचप्रमाणे आंब्याच्या झाडावर लागलेले लहान फळ आणि मोहर गळून पडल्याने यावेळी आंबे महाग होण्याची शक्यता आहे. वैरागड आणि परिसर जंगल व्याप्त असल्याने अवकाळी पाऊसाने जंगलातील रानमेवा फळ गळून पडले. अचानक आलेल्या अवकाळी पाऊसाने गाव चिखलमय होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे. रब्बी हंगामातील पिके भाजीपाल्यासही फटका बसला आहे.

# विधानसभेच्या कामकाजाला गृहीत धरणे एम.देवेंद्र सिंग यांना पडले महागात

## आ.मुनगंटीवार यांच्या मागणीनुसार तालिका सभापतींचे आदेश

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम.देवेंद्र सिंग निलंबित

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

विधानसभेच्या कामकाजाला तसेच मंत्र्यांना गृहीत धरणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग यांना महागात पडले असून २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने एम. देवेंद्र सिंग यांना निलंबित केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने २७ फेब्रुवारी रोजी तत्संबंधाने आदेश निर्गमित केला आहे. २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत राजुरा विधानसभेतील प्रदूषणाच्या प्रश्नावर अर्धा तास चर्चा झाली. या चर्चेला उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना ब्रिफींग साठी बोलावले असता त्यांनी स्पष्ट नकार दिला असे विधानसभागृहात सांगितले. ही बाब अतिशय गंभीर असल्याचे सांगत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी एम. देवेंद्र सिंग यांच्यावर कारवाईची मागणी केली. यावेळी तालिका सभापती दिलीप लांडे यांनी त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आज २७ फेब्रुवारी रोजी त्यांच्या निलंबनाचा आदेश राज्य शासनाने निर्गमित केला आहे.



**आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला हक्कभंगाचा प्रस्ताव**

दरम्यान आ सुधीर मुनगंटीवार यांनी २७ फेब्रुवारी रोजी विधानसभेत एम देवेंद्र सिंग यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला. यावेळी बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विधानसभागृह हे लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठीचे सर्वोच्च व सर्वभौम व्यासपीठ आहे. अशा पवित्र सभागृहात मांडण्यात आलेल्या लोक हिताच्या विषयावर उत्तर देण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना ब्रिफिंगसाठी उपस्थित राहण्यास नकार देणे हा केवळ प्रशासनिक निष्काळजीपणा नसून विधानसभेच्या अधिकार व विशेषाधिकारांचा अवमान करणारी गंभीर बाब आहे.मंत्रीमहोदयांना विषयावरील संपूर्ण माहिती उपलब्ध करून देणे ही संबंधित अधिकाऱ्यांची वैधानिक व प्रशासकीय जबाबदारी आहे. त्या कर्तव्यात कसूर करून अप्रत्यक्षपणे विधानसभेच्या कार्यात अडथळा निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे ही कृती सभागृहाच्या विशेषाधिकारांचा भंग आहे.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ चे सदस्य सचिव यांच्या विरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव स्वीकारून हा विषय विशेषाधिकार समितीकडे पुढील चौकशी व कारवाईसाठी पाठवावा अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली. हे प्रकरण निश्चितपणे गंभीर असून या प्रकरणी शासनाची भूमिका जाणून घेत पुढील कारवाई करण्याचे आश्वासन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

# माणिकगड सिमेंट कंपनीवर कारवाई करा

## आमदार सुधाकर अडबाले यांची तारांकित प्रश्नाद्वारे सभागृहात मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

गडचांदूर शहरातील वाढते प्रदूषण व आरोग्याचा प्रश्न तारांकित प्रश्नाद्वारे अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सुधाकर अडबाले यांनी उपस्थित करत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याचा गंभीर आरोप केला. संबंधित माणिकगड सिमेंट कंपनीवर तातडीने दंडात्मक कारवाई करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी केली.आमदार अडबाले यांनी मांडलेल्या प्रश्नात गडचांदुर शहरालगत असलेल्या माणिकगड सिमेंट उद्योगात इंधन म्हणून घनकचऱ्याचा वापर केला जातो.

या कचऱ्याचे साठवण डम्पिंग यार्ड शहराच्या अगदी जवळ करण्यात येत असून, तेथून येणारी दुर्गंधी व ज्वलनावेळी निर्माण होणारा धूर सुमारे एक किलोमीटर परिसरात पसरतो. परिणामी घरांमध्ये धूळ साचणे, वाहनांवर प्रदूषणाचा थर बसणे तसेच नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत.त्यांनी पुढे विचारले की, शहरालगत असलेले डम्पिंग यार्ड अन्यत्र हलविण्याबाबत निर्णय घेतला जाणार का? नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणार का? प्रदूषणास जबाबदार कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार का? या प्रश्नाला उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले की, प्राप्त तक्रारीनंतर प्रशासनाने यापूर्वीही संबंधित उद्योगाला नोटिसा बजावल्या आहेत. वर्ष २०२२ मध्ये कारणे दाखवा नोटीस देऊन सुमारे ५० लाखांची बँक हमी जप्त करण्यात आली होती. त्यानंतर २०२४-२५ दरम्यानही पुन्हा उल्लंघन आढळल्याने १५ लाखांची हमी




जप्त करण्यात आली आहे.प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित तपासणी व हवा गुणवत्ता परीक्षण सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, पुन्हा तक्रार असल्यास तातडीने अधिकाऱ्यांना पाठवून प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. डम्पिंग यार्ड स्थलांतराबाबतचा निर्णय हा स्थानिक स्वराज्य संस्थांचा विषय असल्याचे स्पष्ट करत, उद्योगाने घनकचरा साठवणूक मधून इंधन म्हणून वापरणे बंद करण्याबाबत लेखी कळविल्याचेही त्यांनी सभागृहात उत्तरात नमूद केले. आरोग्यविषयक परिणामांबाबत आवश्यक ती माहिती आरोग्य विभागामार्फत घेऊन उपाययोजना करता येतील, असेही त्या म्हणाल्या.दरम्यान, प्रदूषण नियंत्रणासाठी संबंधित यंत्रणेमार्फत सातत्याने कारवाई व देखरेख सुरू राहील, असे प्रशासनाने स्पष्ट केले. सभागृहात हा मुद्दा चर्चेचा विषय ठरला असून गडचांदूरमधील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. माणिकगड सिमेंट कंपनी प्रदूषण व आरोग्याच्या संबंधित समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढेपर्यंत शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे आमदार सुधाकर अडबाले यांनी सांगितले.

# अवैध रेती तस्करी करताना उपविभागीय अधिकाऱ्यांनी ट्रॅक्टर पकडले

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

तारडा रेती घाटावरून अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर प्रशासनाने दि.२७ शुक्रवारी दुपारी २ वाजता कारवाई करत वाहन जप्त केले. एमएच ३४ सीआर २३७४ क्रमांकाचे ट्रॅक्टर उद्देश साईनाथ वड्सकर (मु. धानापूर) यांच्या मालकीचे असून ते धनापूर येथील स्मशानभूमीजवळ पकडण्यात आले.

घरकुल धारकांना शासनमान्य पद्धतीने रेतीचे वाटप सुरू असताना काहीजण घाटावरून अवैधरीत्या रेती भरून खुल्या बाजारात विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय अधिकारी लघीमा तिवारी यांनी प्रत्यक्ष धाड टाकली. कर्तव्यावर असताना त्यांनी स्वतः ट्रॅक्टर अडवून कारवाई केल्याने रेती तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.

सदर ट्रॅक्टर तहसील कार्यालयात आणून उभे करण्यात आले आहे. तहसीलदार शुभम बहाकर आणि नायब तहसीलदार अरविंद चांदेकर यांनी




वाहन ताब्यात घेऊन जप्तीनामा तयार केला असून पुढील प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.घाटावरून संबंधित वाहनाला रेती कोणी व कशा पद्धतीने भरून दिली, याची सखोल चौकशी केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. शासनाच्या योजनांसाठी राखीव असलेली रेती अपहाराने विक्रीस काढल्यास कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.दरम्यान, या कारवाईमुळे तारडा परिसरातील अवैध रेती तस्करीवर काही प्रमाणात आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# संपादकीय

## आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.

मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे.शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी यंदा ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला असून, अर्थसंकल्पातील एकूण तरतुदींपैकी सुमारे ६० टक्के वाटा (४८ हजार १६४.२८ कोटी रुपये) भांडवली खर्चासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ५ हजार ५२० कोटी रुपयांची तरतूद आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेत प्रशासक म्हणून कारभार सुरू असताना मुदत ठेवी ९२ हजार कोटी रुपयांवरून ८१ हजार कोटींवर घसरल्या आहेत, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला गेला. त्यात तथ्य नाही हे अर्थसंकल्पातून दाखवून देण्यात आले. गेल्या तीन-चार वर्षांत रस्ते कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सुशोभीकरणावरही कोट्यवधींचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील खड्ड्यांचे प्रमाण कमी झाले याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे. मात्र, मुंबई शहरात बेस्ट, मेट्रो, एमएमआरडीए या स्वायत्त संस्थाच्या माध्यमातून रस्त्यावर एकाचवेळी कामे सुरू असल्याने, वाहतुकीच्या कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील वर्षी या सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्च २ लाख ३३ हजार कोटी रुपये एवढा होता. त्यामुळे एका वर्षात ११ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेचा महसुली वाढीसाठी सन २०१७ पासून बंद झालेल्या करमणूक शुल्काची आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच विकासकामाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका ग्रीन बाँड्स काढण्याची कार्यवाही करणार आहे. मुंबई शहरात रेल्वे स्थानके, रुग्णालये, शाळा आणि अरुंद पदपथांजवळच्या परिसरात फेरीवाल्यांचे बस्तान बसलेले जागोजागी दिसते. महापालिकेने फेरीवाल्यांचा त्रास कमी करण्यासाठी आणि अधिकृत विक्रेत्यांची ओळख पटवण्यासाठी अर्थसंकल्पात क्यूआर कोड आधारित प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली, त्याचे स्वागत करायला हवे. मुंबईत सुमारे १ लाख फेरीवाले असले तरी सर्वेक्षणात केवळ १५ हजार फेरीवाले पात्र आढळले आहेत. आता या पात्र फेरीवाल्यांनाच आता क्यूआर कोड असलेले डिजिटल प्रमाणपत्र दिले जाणार असल्याने अधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले ओळखणे सोपे होणार आहे. प्रशासनाकडून यापुढे अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई झाल्यास मुंबईकरांना रस्त्यांवरून चालताना मोकळा श्वास घेता येईल.

# दौंडच्या तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा प्रत्येकी ५ कोटींचा निधी जाहीर

## आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला विधानसभेत यश

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

दौंड मतदारसंघातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार राहुल कुल यांनी विधानसभेत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. राहू येथील श्री शंभू महादेव मंदिर, कुसेगावचे भानोबा देवस्थान आणि नारायण बेट (देऊळगाव गाडा) या तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा देऊन त्यांच्या विकासासाठी प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले आहे.राहू - श्री शंभू महादेव मंदिर राहू येथील प्राचीन श्री शंभू महादेव मंदिर हे परिसरातील श्रद्धास्थान मानले जाते. महाशिवरात्री आणि इतर धार्मिक उत्सवांमध्ये येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. 'ब' वर्ग दर्जा मिळाल्याने मंदिर परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि भक्तनिवास आदी सुविधांच्या उभारणीला गती मिळणार आहे.कुसेगाव - भानोबा देवस्थानकुसेगावचे भानोबा देवस्थान हे ग्रामदैवत म्हणून ओळखले जाते. यात्रोत्सवाच्या काळात हजारो भाविक येथे हजेरी लावतात.



शासनाच्या निधीमुळे मंदिर सुशोभीकरण, सभामंडप, पार्किंग व्यवस्था आणि सुरक्षाव्यवस्था सुधारण्यास मदत होणार आहे. नारायण बेट (देऊळगाव गाडा)भीमा नदीकाठावरील नारायण बेट हे नैसर्गिक आणि धार्मिक महत्त्व लाभलेले ठिकाण आहे. येथे येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी घाट, प्रकाशयोजना आणि सुरक्षित प्रवेशमार्ग उभारण्याची गरज होती. वनक्षेत्र व इतर तांत्रिक बाबी निकाली काढण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. विधानसभेतील ठोस मांडणी विधानसभेत 'अर्धा तास चर्चे'च्या माध्यमातून आमदार राहुल कुल यांनी हा विषय आक्रमकपणे मांडला. त्यांनी केवळ या तीनच नव्हे, तर केडगावचे पद्मावती माता मंदिर, रोटीचे रोटमलनाथ मंदिर आणि राजेगावचे राजेश्वर मंदिर यांच्याही विकासासाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.यावर उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, संबंधित प्रस्तावातील त्रुटी जिल्हा परिषदेकडून तातडीने दूर करून निकष पूर्ण करण्यात येतील. निकषात बसणाऱ्या इतर 'क' वर्ग तीर्थक्षेत्रांनाही 'ब' वर्गात समाविष्ट करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. विकासाला नवी चालना 'ब' वर्ग दर्जा आणि प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी मिळाल्याने दौंड तालुक्यातील धार्मिक पर्यटनाला नवे बळ मिळणार आहे. पायाभूत सुविधा, भक्तनिवास, स्वच्छता, रस्ते व पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सोयींमध्ये सुधारणा होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

**मतदारसंघातील धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. केवळ दर्जावाढ नव्हे, तर भाविकांना उत्तम सुविधा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. शासनाने दिलेल्या निधीमुळे या देवस्थानांच्या विकासाला निश्चितच गती मिळेल.**

**- आमदार राहुल कुल**

# मासिक पाळी दरम्यान पगारी सुट्टीचा मुद्दा केवळ रजेपुरता मर्यादित नसून स्त्रीच्या सन्मान,आरोग्य आणि कार्यक्षमता यांच्याशी निगडित-उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे

## मासिक पाळी विषयाकडे सामाजिक, सांस्कृतिक आणि आरोग्यदृष्ट्या पाहण्याची गरज

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सरकारी व सार्वजनिक क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळी दरम्यान पगारी सुट्टी देण्याच्या धोरणाचे परीक्षण व व्यवहार्यता तपासण्यासाठी आज (२७ फेब्रुवारी २०२६) रोजी आयोजित चर्चासत्रात विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे प्रमुख उपस्थित होत्या. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आयोजित केलेल्या या चर्चासत्रात मासिक पाळी दरम्यान पगारी सुट्टी देणे योग्य की अयोग्य? याबाबत सखोल विचारमंथन करण्यात आले.आपले मत व्यक्त करताना डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, राज्य महिला आयोग हा केवळ कृतीपुरता मर्यादित नसून वैचारिक दिशादर्शन करणारा संस्थात्मक मंच आहे. समाजाच्या बदलत्या गरजांनुसार धोरणांमध्ये प्रतिबिंब पडावे, ही आयोगाकडून अपेक्षा असते. मासिक पाळी हा विषय केवळ आरोग्याचा नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक आयामांशी निगडित आहे. प्रत्येक समाज, प्रत्येक देश आणि प्रत्येक कुटुंबामध्ये मासिक पाळीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. त्यामुळे सर्वांसाठी एकसारखा नियम करताना किमान व कमाल मर्यादा, तसेच व्यावहारिक परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे.त्या म्हणाल्या की, मासिक पाळी ही स्त्रीच्या शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने नैसर्गिक आणि आवश्यक प्रक्रिया आहे; परंतु तिच्याभोवती असलेल्या समजुती, परंपरा आणि अनुभव वेगवेगळे असतात. काही घरांमध्ये या काळात विश्रांती



दिली जाते, तर काही ठिकाणी कोणताही भेदभाव केला जात नाही. स्त्रीला वेदना किंवा अस्वस्थता होत असली तरी तिला मी सक्षम आहे हे सातत्याने सिद्ध करावे लागते, ही वस्तुस्थिती आजही कायम आहे. कामाच्या ठिकाणी मासिक पाळीबाबत उघडपणे बोलणे अनेक महिलांना अवघड जाते. काही ठिकाणी त्यावर विनोद किंवा टिप्पणी होण्याची भीतीही महिलांना वाटते.डॉ. गोऱ्हे यांनी सूचित केले की, शासनाने दोन ते तीन दिवसांच रजा देण्याचा जरी विचार केला, तरी वर्षभरात त्याचे एकूण दिवस मोठ्या संख्येने वाढू शकतात. त्यामुळे मासिक पाळी रजा असा स्वतंत्र उल्लेख करण्याऐवजी ती वैयक्तिक रजा म्हणून समाविष्ट करण्याचा पर्याय विचारात घ्यावा. यामुळे अनावश्यक तुलना, स्पर्धा किंवा गैरसमज टाळता येतील.प्रत्येक स्त्रीची शारीरिक अवस्था वेगळी असते; काहींना पहिल्या दिवशी त्रास होतो, काहींना होत नाही, तर काहींमध्ये मासिक चक्र अनियमित असते. म्हणूनच वैयक्तिक निवडीचा पर्याय खुला ठेवणे आवश्यक आहे. ज्या महिलांना ही रजा नको असेल, त्यांना ती इतर रजांमध्ये रूपांतरित करण्याची मुभा असावी, असेही त्यांनी नमूद केले.त्याचबरोबर, कोणत्याही महिला कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक मासिक पाळी संदर्भातील माहितीस सार्वजनिकरीत्या वाव देणे अथवा त्यावर जाहिर चर्चा करणे अमान्य ठरविण्यासाठी स्पष्ट नियम असावेत, असे त्यांनी अधोरेखित केले. अशा प्रकारच्या गोपनीयतेचा भंग झाल्यास त्याची नोंद गोपनीय अहवालात करण्यासारखे निकष ठरविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.डॉ. गोऱ्हे यांनी विविध व्यावसायिक क्षेत्रांचा संदर्भ देत सांगितले की, काही क्षेत्रांमध्ये जसे आरोग्यसेवा, पोलीस सेवा किंवा खेळ - जबाबदाऱ्या तातडीच्या स्वरूपाच्या असतात. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रानुसार लवचिक धोरण आवश्यक आहे. मासिक पाळीच्या सुरुवातीच्या काळात तरुण मुलींना अधिक त्रास होऊ शकतो, तसेच मेनोपॉजच्या काळातही शारीरिक व मानसिक बदलांचा सामना करावा लागतो. याबाबत शास्त्रीय माहिती, ताणतणाव नियंत्रण आणि स्वच्छता या विषयी जागरूकता वाढविणे अत्यावश्यक आहे.मासिक पाळी दरम्यान पगारी सुट्टीचा मुद्दा हा केवळ रजेपुरता मर्यादित नसून स्त्रीच्या सन्मान, आरोग्य आणि कार्यक्षमता यांच्याशी निगडित आहे. संवेदनशीलता, समानता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांचा समतोल राखत धोरण आखले गेले पाहिजे, असे मत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

# लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती यांच्या माध्यमातून आझाद मैदान येथे धरणे आंदोलन



**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकनेते दि. बा . पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती यांच्या माध्यमातून जो लढा गेली ४ वर्षांपासून लढा चालू आहे तो म्हणजे नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव द्यायला हवे.महाराष्ट्र सरकारने केंद्रसरकारला नावाच्या पाठवलेल्या प्रस्तावाबाबत अजून कुठलीच सकारात्मक चर्चा नाही म्हणुन अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी इथल्या स्थानिक नेत्यांना व मंत्रिमंडळाला सांगण्यासाठी धरणे आंदोलन हे आझाद मैदान याठिकाणी घेण्यात आले.लवकरच मोठया आंदोलनाची तयारी चालू आहे व पुढील नियोजन लवकरच घेण्यात येईल. असे यावेळी ठरविण्यात आले.या वेळी आझाद मैदान मध्ये कृती समिती अद्यक्ष दशरथ दादा पाटील , भूमिपुत्र नेते व लोकसभेचे खासदार बाळ्या मामा म्हात्रे , कृती समिती सद्यस्य व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस संतोष घरत , पनवेल चे माजी उपमहापौर जगदीश भाई गायकवाड , कृती समितीमधील अन्य सदस्य व मुंबई ,रायगड मधून आलेले सर्व आगरी कोळी बांधव व सर्व समाजबांधव उपस्थित होते. रायगड जिल्हा व मुंबईला जोडणाऱ्या महत्वाचा सागरी मार्ग असलेल्या अटल सेतूचा मार्ग अडवून आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# मराठी भाषेने मराठी माणसाला स्वाभिमानाचा ताठ कणा दिला आहे-साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील



**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । प्रतिनिधी**

उरण एसटी डेपोमध्ये मराठी भाषा दिन साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.पाटील आपल्या भाषणात म्हणाले की,संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम पासून कुसुमाग्रज आणि आजच्या लहान मोठ्या लेखकांनी मराठीला समृद्ध केले आहे.मराठी भाषेचा स्वाभिमानाचा ताठ कणा जगण्यासाठी दिला आहे.तसेच पाटील यांनी माय बोली सारेबाराचा पलाट आगरीबोलीत कविता सादर केल्या.दुसरे वक्ते कवी संजीव पाटील यांनी वि.वा.शिरवाडकर यांच्या जीवनावर विचार मांडून आपल्या कविता सादर केल्या. विशेष म्हणजे प्रवासाची निघालेल्या प्रवाशांनी ही मनसोक्त ऐकून भरपूर दाद दिली. कार्यक्रमाला अधिक्षिका दीपा कोंढारकर,विभागिय नियंत्रक तुषार शिंदे, तानाजी भोईर,रोहन खलिपे, चंद्रकांत देसले, संतोष दळवी,संदिप चौहान, प्रभाकर म्हात्रे,पंकज म्हात्रे इत्यादी प्रमुखांची लक्षणीय उपस्थिती होती.

# कोणताही नागरिक न्यायापासून वंचित राहू नये-न्यायमूर्ती धोटे

## भोकर येथील मेळाव्यात विविध सेवासाठी ५० स्टॉल

दैनिक वादळ वाता
**भोकर । प्रतिनिधी**

संविधानानुसार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणे हा त्यांचा हक्क आहे. वंचित घटक मोफत न्याय व शासकीय योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी विधी सेवा प्राधिकरणामार्फत सातत्याने शिबिरे आयोजित केली जातात. या महाशिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत कायद्याची माहिती व विविध शासकीय योजना पोहोचवाव्यात, असे आवाहन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती निरज पी. धोटे यांनी केले.

विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, तालुका विधी सेवा समिती भोकर व अभिवक्ता संघ भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने भोकर येथील हनुमान नगर, किनवट रोडवरील खुले मैदान येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय सेवांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. न्यायमूर्ती नीरज धोटे यांच्या हस्ते वृक्षांना पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर मोहम्मद सलीम, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेगशेट्टी, अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. त्रेपतवार यांच्यासह न्यायाधीश, विविध विभागांचे अधिकारी, विधीज्ञ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी बंजारा नृत्याचे सादरीकरण केले.

न्यायमूर्ती नीरज धोटे म्हणाले, शासन विविध कल्याणकारी योजना राबवित असले तरी अनेकांना त्यांची माहिती नसते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या मेळाव्यातील सर्व स्टॉलना भेट देऊन योजनांची माहिती घ्यावी व त्यांचा लाभ घ्यावा.

येत्या १४मार्च रोजी आयोजित लोकअदालतीत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी पक्षकार व विधीज्ञांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क प्रमुख जिल्हा न्यायाधीश नरेंद्र ब्रम्हे

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे यांनी संविधानातील कलम ३९ (अ) नुसार समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क असल्याचे सांगितले. न्याय मागण्याची संधी प्रत्येकाला समान आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध समित्यांमार्फत कायदेविषयक जनजागृती केली जाते. या महाशिबिराचा उद्देश वंचित घटकांना कायद्याची माहिती व शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा आहे. आपण या माध्यमातून कायदेशीर साक्षरते कडून कायदेशीर सक्षमते कडे वाटचाल करीत आहोत असे त्यांनी सांगितले.

यावेळी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. त्रेपतवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

मान्यवरांच्या हस्ते लाभांचे वितरण

महामेळाव्यात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मदत व आदेशपत्रांचे वितरण करण्यात आले. तहसील कार्यालयामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बेबी केअर किट, कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर वितरण, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत प्रत्येकी दोन लाख रुपयांचे अनुदान आदींचे वितरण करण्यात आले. आरोग्य, शिक्षण व विद्युत विभागाकडूनही विविध प्रमाणपत्रे व लाभ देण्यात आले.

महामेळाव्यात विविध विभागांचे ५० स्टॉल उभारण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तदर्थ जिल्हा न्यायाधीश बी. यू. चौधरी व वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश ए. पी. कराड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव शरद देशपांडे यांनी केले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी सर्व स्टॉलना भेट देऊन पाहणी केली.

## श्री हनुमान शिक्षण संस्थेच्या वतीने जिल्हा क्रीडाअधिकारी,तालुका क्रीडा अधिकारी आणि श्री नेताजी सावंत या त्रिमुर्तींचा सत्कार

दैनिक वादळ वाता
**औसा । प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री.महादेवजी कसगावडे साहेब व कर्तव्यदक्ष तालुका क्रीडा अधिकारी तथा राज्य क्रीडा मार्गदर्शक मा.श्री. चंद्रकांतजी लोदगेकर साहेब यांनी हनुमान शिक्षण संस्था शिवली द्वारा संचलित श्री हनुमान विद्यालय शिवली या औसा तालुक्यातील नामांकीत शाळेस अचानक भेट देऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूरच्या वतीने देण्यात आलेल्या क्रीडांगण दुरुस्ती अनुदान,पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम अनुदान,आणि ओपन जिम करीता अनुदान देण्यात आले होते. या आर्थिक निधीचा यथोचित विनियोग करून विद्यार्थांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी सदर शाळेस अचानक भेट देऊन तपासणी केली.याप्रसंगी क्रीडांगण दुरुस्ती,सुसज्ज पिण्याच्या पाण्याची टाकी, तसेच सर्व विद्यार्थ्यांना पिण्यायोग्य शुद्ध पाण्याची सुविधा,सुसज्ज ओपन जिम,सुसज्ज इमारत , विविध खेळाचे भव्य क्रीडांगण,क्रीडा साहित्य, आणि या मैदानावर खेळत असलेले अष्टपैलू व्हॉलेबॉलपट्टू , अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद व प्रतिक्रीया पाहून,याच शाळेतील अनेक खेळाडू व्हॉलेबॉल व इतर खेळामध्ये विभागातून प्रथम क्रमांक पटकावून शालेय राज्यस्तरावर स्पर्धेत सहभागी झाल्याचे ऐकून आणि शाळेतील विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध अनेक भौतिक सुविधा,तसेच शासनाने दिलेल्या निधीचा यथायोग्य उपयोग केल्याचे पाहून जिल्हा क्रीडाअधिकारी व राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांतजी लोदगेकर साहेब यांनी समाधान व्यक्त केले.



तसेच याप्रसंगी हनुमान शिक्षण संस्थेचे सचिव मा.श्री.मोहनराव साळुंके आणि संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.डॉ.विजय माणिकराव जाधव यांच्या हस्ते कर्तव्यदक्ष जिल्हा क्रीडाअधिकारी महादेवजी कसगावडे साहेब,राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांतजी लोदगेकर साहेब आणि जालना जिल्ह्यातील अंबड येथे नुकत्याच झालेल्या शिक्षकांच्या राज्यस्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धेत योग गुरु पतंजली योग समिती औसा तालुकाध्यक्ष,तथा मुफटा शिक्षक संघटना औसा तालुकाध्यक्ष श्री नेताजी सावंत सहशिक्षक श्रीराम माध्यमिक विद्यालय एरंडी - सारोळा ता.औसा, जि.लातूर यांनी महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावून लातूर जिल्ह्याला सुवर्णपदक मिळवून दिले बद्दल श्री नेताजी सावंत सर आणि वरील वरीष्ठ दोन अधिकारी या त्रिमूर्तींचा हनुमान शिक्षण संस्थेच्या वतीने व हनुमान विद्यालयाच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.या सत्कार प्रसंगी हनुमान विद्यालय शिवलीचे विद्यमान मुख्याध्यापक राजाभाऊ गाडेकर,माजी मुख्याध्यापक संदिपानजी माळी,तसेच शाळेतील विद्यार्थी,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाटोदा बु येथील स्वस्त धान्य दुकानदार विरुद्ध तक्रार चौकशी रस्त्यावर;मंडळी नाराज

# तीन महिन्यापासून चौकशी न झाल्याने गावकरी विचारेत



दैनिक वादळ वाता
**मांडवी । प्रतिनिधी**

किनवट तालुक्यातील पाटोदा (बु) येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडून स्वस्त धान्य दुकानसाठी तंटामुक्ती भवनाचा पाटोदा (बु) येथील स्वस्त धान्य दुकानदाराकडून रेशन धारकांना अनियमित धान्य पुरवठा करण्यात येतो दिलेल्या धान्याची पावती दिली जात सरकारमान्य स्वस्त धान्य दुकान वापर केला जात आहे तसेच शासनाचे नियम पालन न करता रेशन धारकांना अनियमित धान्य देत असून स्वस्त धान्य दुकान परवाना रद्द करण्याची मागणी ग्रामस्थांने तहसीलदार यांचे कडे करण्यात आले होते पण तीन महिने लोटले तरी चौकशी करण्यात आली नसल्याने ग्रामस्थांकडून संतप्त झाल्याचे दिसून येत आहे.

नाही शासनाने दिलेल्या दरापेक्षा जास्त रुपये घेतल्या जाते प्रति कार्ड धारकांस एक किलो धान्य कमी दिला जातो रेशन दुकानात माहिती व भाव फलक लावलेला नाही त्या फलकावर नाव, दुकान क्रमांक, वेळ, सुट्टी चा दिवस, फोन नंबर, धान्य दर, उपलब्ध साठा, बी पी एल, अंतोदय ची माहिती बोर्डावर असणे अनिवार्य असताना

नियमाचे पालन केला जात नाही रेशन दुकानासाठी प्रयाप्त खोली नसून तंटामुक्ती भावनांचा दुकान म्हणून वापर केला जातहोता तक्रार देताचं तंटामुक्ती भवन रिकामी करण्यात आला हे सर्व गैर व्यवहार सरपंच यांच्या निदर्शनाखाली होत आहे असे गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे रेशन दुकाणावर देखरेख करण्यासाठी दक्षता समिती नेमणूक केली आहे परंतु सरपंच यांच्या दबावाखाली कर्तव्यात कसूर करत आहे या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून स्वतः धान्य दुकान परवाना रद्द करण्याची मागणी पाटोदा (बु) ग्रामस्थांनी तहसीलदार किनवट ऑपीस यांच्याकडे केली आहे.. लवकर खुलासा करण्यात यावा ही विनंती गावकरी करत आहे...

# पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड येथे विज्ञान प्रदर्शन व सी.व्ही.रमण सन्मान दिवस उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला वाव देनारा एक उतकृष्ट उपक्रम-संजय यलमवाड

दैनिक वादळ वाता
**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड येथे राष्ट्रीय विज्ञान दिनाचे व सी.व्ही.रमण सन्मान दिवसाचे औचित्य साधून विज्ञान प्रदर्शन व राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन सोहळा नुकताच संपन्न झाला.सदरिल विज्ञान मेळाव्याचे उदघाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.संजय यलमवाड व दैनिक श्रमिक लोकराज्यचे संपादक ज्ञानेश्वर डोईजड यांच्या हस्ते करन्यात आले.या वेळी प्रमुख पाहुने म्हणून दैनिक पुढारी वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी अविनाश देशमुख,शिक्षणविस्तार अधिकारी यु.पी.चव्हाण सर,सांस्कृतिक विभाग प्रमुख दिलीप देवकांबळे सर,एस.बी.राजपुत सर,दिपक लोहबंदे सर,सुधीर रॅपनवाड,सुधाकर चव्हाण,नितीन तलवारे,उपस्थित होते.विज्ञान मेळावा या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कल्पकता आणि सुप्त गुणांना व्यासपीठ मिळाले असून मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांनी प्रयोगांतून उलगडले विज्ञानाचे महत्त्व





या प्रदर्शनात शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोगांचे प्रात्याक्षिकासह त्यामागील शास्त्रीय तत्त्वे समजावून सांगितली.इयत्ता पहिली ते नव्वीच्या एकून १६१ विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवत ८२ विविध नाविन्यपूर्ण प्रयोग सादर केले.यात उल्लेखनिय प्रयोग पाण्याची घणता,पाण्यातील दिवे,वनस्पतीचे अवयव,श्वसनास जळक्षरपलहळ अवशक्ता,हवेच्या दाबाचा परिणाम,मानवी शरिर अवयव,ज्वालामुखी उद्रेक,मानवी शरिरातील अंतद्रीय,प्रकाशसंश्लेशन,पवन उर्जा,पाण्यावरिल विज निर्मिती,स्वंयचलित पथदिवे,रासायणिक अभिक्रीया,जलशुद्धिकरन,भुकंप मापन यंत्र,चंद्रायान सारखे प्रयोग पाहून उपस्थित पालक व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या या प्रयोगांचे विशेष कौतुक केले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.संजय यलमवाड यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला असून, यावेळी विज्ञान विभागाचे प्रमुख एस.बी.राजपुत सर,सौ.अश्विनी कुलकर्णी मॅडम,देशपांडे मॅडम,अंकाडे सर,व्यंकटी केंद्रे सर,हरी भालेराव सर,सुधीर शृंगारे सर,हरीदास पवार सर,दुरनाळे सर, यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी विज्ञान मेळाव्यातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या,प्रयोग प्रात्याक्षिक,४८ विद्यार्थीनीनी किडनीची संरचना,ह्रदयाची रचना या सारख्या संदेश देनार्या रांगोळी,जगप्रसिद्ध ५२ शास्त्रज्ञांचे फोटो व कार्ये असलेले पोष्टर प्रदर्शनाची पहाणी करून समाधान व्यक्त केले व सर्वांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य व सी.व्ही.रमण यांच्या जयंती निमित्त आयोजित विज्ञान मेळावा यशस्वी करण्यासाठी विज्ञान विषयाचे विभाग प्रमुख एस.बी.राजपुत सर,सांस्कृतिक विभाग प्रमुख दिलीप देवकांबळे सर,अश्विनी कुलकर्णी मॅडम,अशालता स्वामी मॅडम,देशपांडे मॅडम,येवतीकर मॅडम,गडगिळे मॅडम,सौ.कदम मॅडम,मठपती मॅडम,दिनकर मॅडम,मुपडे मॅडम,संगिता माळगे मॅडम,सौ.शेटकार मॅडम,पाटील मॅडम, कुमुटकर मॅडम,धनशेट्टी मॅडम,अंबादास देशमुख सर,मुद्देवाड सर,सौ.लोणीकर मॅडम,भवानीसिंह चौहाण सर,जिवन वडजे सर,अकबर सर,चंद्रकांत डावकरे सर,यांनी विशेष परिश्रम घेतले.हा सोहळा विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीस तसेच त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला, अशी भावना यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय यलमवाड सह दैनिक लोकमतचे पत्रकार चंद्रशेखर पाटील,यांनी व्यक्त केली.

# जि.प.प्रा.शाळा हरडफ येथे विज्ञान प्रदर्शन व बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरडफ येथे विज्ञान प्रदर्शन व प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचा भव्य बक्षीस वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक कल्पकता आणि सुप्त गुणांना व्यासपीठ मिळाले.

प्रयोगांतून उलगडले विज्ञानाचे महत्त्व

या प्रदर्शनात शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक प्रयोगांचे साहित्य व त्यामागील शास्त्रीय तत्त्वे प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदवत विविध नाविन्यपूर्ण प्रयोग सादर केले. उपस्थित पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या प्रयोगांचे विशेष कौतुक केले.

मान्यवरांच्या हस्ते गौरव

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. पवन पाटील मोरे यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. कृष्णा पाटील हरडफकर, श्री. शिवाजीराव धावडकर, श्री. संदीप सूर्यवंशी, नितीन बोढारे, अविनाश मोरे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते क्रीडा व विज्ञान स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या प्रयोगांची पाहणी करून समाधान व्यक्त केले व सर्वांना विज्ञान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शिक्षकांचे परिश्रम

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती वंदनाताई पावडे, विज्ञान शिक्षक श्री. डी. एस. जीवने, श्री. वडजे सर, श्री. नरवाडे सर, श्री. चुनाळे सर, श्री. पवार सर, श्री. गुरमे सर व श्रीमती कदम मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. हा सोहळा विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीस तसेच त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला, अशी भावना यावेळी शिक्षकांनी व्यक्त केली.




# सरकारी अनुदानाचा असाही 'खो'; नऊ महिन्यांपासून शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**




शासनाच्या वतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेतीकामात सुलभता आणण्यासाठी विविध अनुदान योजना राबविल्या जात आहेत. असे असले तरी तालुक्यात मात्र चित्र उलट दिसत आहे. गत अनेक महिन्यांपासून ठिबक सिंचन (स्पिंकलर) आणि कृषी यांत्रिकीकरणाचे अनुदान रखडले आहे. त्यामुळे स्वताची पदरमोड करून गुंतवणूक केलेले शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

शासनाच्या उदासीन धोरणामुळे योजना मात्र केवळ नावापुरत्याच दिसत आहेत

पिकांसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा आणि मजुरीचा खर्च वाचावा या उद्देशाने अनेक शेतकऱ्यांनी स्पिंकलर प्रणाली बसवण्यासाठी अर्ज केले होते. शासनाकडून यासाठी एकूण १९ हजार ३५४ रुपयांचे अनुदान दोन हप्त्यांत (१३,३०६ आणि ६०४८) दिले जाते. २०२५-२६ या वर्षात लाभ घेतलेल्या सुमारे ५५० शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाही मिळालेला नाही. विशेष म्हणजे, या अनुदानासाठी शेतकरी गेल्या नऊ महिन्यांपासून कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत. शेतीतील कष्ट कमी करण्यासाठी ट्रॅक्टर, रोटावेटर आणि इतर आधुनिक अवजारांसाठी कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत अनुदान मिळते. परंतु गत तीन महिन्यांपासून हे अनुदान रखडल्याने कर्जाचे हप्ते फेडायचे कसे? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. आता सदर यांत्रिकीकरण योजनाही कागदावरच आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. खरीप हंगामात अतिवृष्टी आणि आता अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केले.

योजनेचे असे आहे विवरण
ट्रॅक्टर
लाभार्थी
रोटावेटर
लाभार्थी
१,२५,००० रुपये अनुदान
६० लाभार्थी प्रतीक्षेत
४४,००० रुपये अनुदान
२० लाभार्थी प्रतीक्षेत

१५ दिवसांत खात्यावर अनुदान पडेल

ट्रॅक्टर व रोटावेटर यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. या संदर्भातील प्रक्रिया सुरू केली आहे. पुढील १५ दिवसांत पात्र लाभार्थींच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होईल. वरिष्ठ स्तरावरून अनुदान रक्कमेसाठी पाठपुरावा घेतला जात आहे.
चंद्रकांत नीमोड, तालुका कृषी अधिकारी, किनवट

# मांडवी ते आदिलाबाद राज्य मार्गावर जीवघणे खड्डे अपघाताचे प्रमाण वाढत आहे

दैनिक वादळ वार्ता
**पिपंळगाव मांडवी । प्रतिनिधी**

मांडवी ते आदिलाबाद राज्य मार्गावरील मांडवी पासून सरस विद्यालय पर्यंत तलाईगुडाआदिवासी आश्रम शाळा च्या समोर मोठ मोठाले जीव घेणे खड्डे पडले आहे रस्त्यावर अपघातीची मालिका सुरूच असून खड्ड्यामुळे वाहनधारकाचा जीव जाण्याचा वाट बघता का अशी संतप्त प्रतिक्रिया वाहनधारकांकडून होत आहे त्वरित खड्डे बुजूवून रस्ते दुरुस्ती करण्यात
यावी अशी मागणी होत आहे. या मार्गावरून क्षमतेपेक्षा जास्त
भारघेऊन आदिलाबाद ची केटीसी कंपनीचे हजारो जड वाहने भर वेगाने नागपूर येवतमाळ दररोज चालत असल्याने या रस्त्याची अक्षरशः चाळणी झालेली आहे विशेष करून दिव्य ज्योती संस्था ते सरस विद्यालय मांडवी पर्यंत च्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने रोज अपघात घडत आहे त्या रस्त्यावर सरस विद्यालय, नेत्र रुग्णालय, अशोक पब्लिक स्कूल, जिल्हा परिषद हायस्कूल असल्याने हजार विद्यार्थी विद्यार्थी जीव मुठीत घेऊन या रस्त्यावरून प्रवास करतात.तालाईगुडा पिपंळगाव रोड समोर पण खूप मोठे खडे पडले आहे



याच रस्त्यावर मांडवी गावाच्या
नाल्याजवळ मोठा खड्डा पडला होता त्या खड्ड्यात तेलंगणातील अज्ञात दुचाकीचा अपघात झाला होता त्या अपघातात वाहन चालक गंभीर जखमी झाले होते त्यात त्याचा मृत्यू झाल्याची चर्चा आहे अपघातानंतर लगेच खड्डा बुजविण्यात आला भविष्यात कोणाचे जीव जाणार नाही याची खबरदारी घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्वरित खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी होत आहे.

# गडचांदूर प्रदूषण प्रकरण तापले!

## माणिकगड सिमेंट कंपनीवर तात्काळ कारवाईची आमदार सुधाकर अडबाले यांची जोरदार मागणी

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**





गडचांदूर शहरातील वाढत्या प्रदूषणाच्या प्रश्नावर विधानसभेत जोरदार आवाज उठवत आमदार सुधाकर अडबाले यांनी माणिकगड सिमेंट कंपनीवर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली. तारांकित प्रश्नाद्वारे त्यांनी नागरिकांच्या आरोग्याशी होत असलेल्या गंभीर खेळाकडे शासनाचे लक्ष वेधले.आमदार अडबाले यांनी सभागृहात सांगितले की, सिमेंट उद्योगात इंधन म्हणून घनकचऱ्याचा वापर केला जात असून त्याची साठवण शहरालगत करण्यात येत आहे. त्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी व धुरामुळे सुमारे एक किलोमीटर परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. घरांमध्ये धूळ साचणे, श्वसनाचे आजार वाढणे अशा तक्रारी सातत्याने येत आहेत.

नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असताना प्रशासनाने नेमकी कोणती कारवाई केली? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. डम्पिंग यार्ड शहराबाहेर हलविण्याबाबत निर्णय घेणार का? तसेच प्रदूषण करणाऱ्या कंपनीवर कठोर दंडात्मक कारवाई होणार का? असे प्रश्नही त्यांनी उपस्थित केले.यावर उत्तर देताना संबंधित मंत्र्यांनी सांगितले की, तक्रारींच्या अनुषंगाने यापूर्वीही कंपनीला नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. २०२२ मध्ये सुमारे ५० लाखांचा दंड आकारण्यात आला होता. २०२४-२५ दरम्यान पुन्हा १५ लाखांचा दंड वसूल करण्यात आला असून प्रदूषण नियंत्रणासाठी नियमित तपासणी व हवा गुणवत्ता परीक्षण सुरू आहे.तसेच, पुन्हा तक्रारी आल्यास तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.दरम्यान, डम्पिंग यार्ड स्थलांतराचा निर्णय हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. उद्योगाकडून पर्यावरण नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड केली जाणार नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

# संगत बिघडली की जीवनाची रंगत बिघडते म्हणून संगत चांगली ठेवा–पुज्य स्वामी गजेंद्र चैतन्यजी महाराज

दैनिक वादळ वार्ता
**भोकर । प्रतिनिधी**



*माणसाची संगत बिघडली की जीवनाची रंगत बिघडते म्हणून सदैव संगत चांगल्या लोकांचीच ठेवा.*परम पूज्य बालयोगी स्वामी गजेंद्र चैतन्य जी महाराज यांनी मौजे हाळदा येथे सुरू असलेल्या श्री शिव महापुराण कथेतून बोलताना केले.

पुढे बोलताना सांगितले की जीवनात सदैव चांगल्याची संगत करा चुकूनही वाईट लोकांची संगत करू नका कारण वाईट लोकांची संगत लागली की माणसाच्या जीवनाचे अध:पतन सुरू होते आणि माणूस रसातळाला जातो. शास्त्रातील व पुराणातील अनेक दाखले देऊन वाईट संगती मुळे मी मी म्हणणारे ऋषीमुनी सुद्धा अध:पतीत झाले तेव्हा आपण कलियुगातले मानव आहोत.म्हणून संगत करायची असेल तर संतांची करा कारण संतांचे संगती मनो मार्गगती; अकळावा श्रीपती येणे पंथे ।। संतांच्या संगतीत मनाला, बुद्धीला चांगले वळण लागते आणि माणूस हा उन्नत जीवन जगतो.जीवनात एकवेळ पंगत चुकली तरी चालेल पण संगत चुकू देऊ नका कारण म्हणतात ना ढवळ्याशेजारी बांधला पवळा वाण नाही पण गुण लागला ते सत्य आहे. ढेकणाच्या संगे हिरा तो भंगला,कुसंगे नाडला साधू जैसा ।। साधु पुरुषही चुकून एखाद्या वाईट व्यक्तीच्या संगतीला लागला तर तोही अध:पतीत होतो. म्हणून जीवनात संगत चांगल्याची करा,चांगले जीवन जगा.संत साहित्याचा अभ्यास करा.कारण त्याने जीवनाची दशा व दिशा बदलते.चांगले संस्कार मिळतात आणि या मनुष्य जन्माचे खरे मर्म आपल्याला कळते. मानव जन्म पुन्हा पुन्हा मिळत नाही म्हणून मिळालेल्या जन्माचे चांगल्यांच्या संगतीत राहून सार्थक करा.असा मौलिक उपदेश त्यांनी आपल्या शिव महापुराण कथेतून बोलताना उपस्थित हजारो भाविक भक्तांना केला.

शिव महापुराण कथा ही मंगलमयी, पुण्यदायी कथा असून ती भक्तीभावाने श्रवण केल्यास जीवनातील सर्व व्यथा दूर करते एवढे सामर्थ्य या शिव कथेत आहे.तेव्हा सर्वांनी ही शिव कथा भक्ती भावाने श्रवण करून केलेल्या उपदेशाप्रमाणे आचरण करा असे सांगितले. या शिव महापुराण कथेला हळदा व हळदा परिसरातील हजारो भाविक भक्त व माता भगीणी हजर राहून कथेचा आस्वाद घेत आहेत.

# अजित पवारांच्या विमान अपघातावर पतंगबाजी नको: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्यूवर कुणीही पतंगबाजी करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. अशा घटना घडतात तेव्हा आपण कोणतीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न करू नये. हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असतो. या प्रकरणी आपण मृत व्यक्तीच्या पद व प्रतिष्ठेचा तथा त्याच्या कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचाही विचार करायला हवा, असे ते म्हणालेत.अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व विरोधी बाकावरील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आमदार हा अपघात नसून, घातपात असल्याचा आरोप करत आहेत. विशेषतः शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या दुर्घटनेविषयी काही महत्त्वपूर्ण खुलासे व पुरावे सादर करून या प्रकरणात घातपाताचा संशय असल्याचा ठाम दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना उपरोक्त आवाहन केले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आमदार रोहित पवार यांनी माझी भेट घेऊन काही मुद्दे मांडले. त्यांनी दिलेल्या पत्राला मी माझे पत्र जोडून डीजीसीएकडे या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करणार आहे. पण अशा घटना घडतात तेव्हा आपण कोणतीही पतंगबाजी करू नये. कारण, हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असतो. दुर्दैवाने जी व्यक्ती मृत आहे, त्या व्यक्तीच्या पद व प्रतिषेठाचा आपण विचार केला पाहिजे. विशेषतः त्याच्या कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचाही या प्रकरणी विचार झाला पाहिजे. त्यामुळे या प्रकरणी कोणतीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करू नये असे मला वाटते. या प्रश्नावर याहून अधिक मी बोलू इच्छित नाही.मुख्यमंत्र्यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विलिनीकरण तथा सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीसाठी करण्यात आलेल्या कथित घाईच्या मुद्यावरही भाष्य केले. तसेच सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय हा आमचा नव्हे तर राष्ट्रवादीचा होता असेही स्पष्ट केले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077